रे.दि.मु.क्र. २६६/१९९३

निशाणी क्र. ८७ खालील आदेश :–

दाव्याच्या दुरुस्तीकरीता वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२) वादीच्या वकीलांनी असे निवेदन केले की, वादीने सदरचा दावा वाटपाकरीता व तिच्या हिश्श्याच्या कब्जाकरीता केला आहे. असे असताना प्रतिवादीने दिनांक ०६/०३/१९८६ रोजी गणपत महादेव सपकाळ यांच्या नावे महादेव हरी सपकाळ यांनी दावा मिळकतींपैकी काही मिळकती व कोंडवली येथील गावठाणापैकी घर जागेचे बक्षीसपत्र केल्याचे दिसते व ती माहिती वादीला अलिकडेच कळाली. त्याबाबत प्रतिवादीने दुरुस्ती लेखसुध्दा दाखल केला आहे. त्या अनुषंगाने वादीला त्याबाबतची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. ९ व १० च्या वकीलांनी असे निवेदन केले की, बक्षीसपत्र हे १९८६ सालचे आहे व ७x१२ च्या उताऱ्यावरुन व फेरफारावरुन त्याबाबतची माहिती वादीला दाखल करतेवेळीच झाली होती. त्यामुळे आता १६ वर्षांनंतर प्रस्तुतची दुरुस्ती मागता येणार नाही. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादीचा कसलाही संबंध नाही. त्याला विनाकारण या दाव्यामध्ये पार्टी करण्यात आले आहे. दावा लांबणीवर टाकण्याच्या उद्देशाने सदरचा अर्ज केला आहे.

३) निर्विवादपणे दावा मिळकतींमध्ये वादीचा हिस्सा आहे असे ठरवून मागणेकरीता व त्याचा तुटक व पृथक कब्जा मिळणेकरीता वादीने सदरचा दावा दाखल केला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादीने गणपत महादेव सपकाळ याच्या नावे दावा जमिनींपैकी काही शेतजमिनी व कोंडवली येथील गावठाणापैकी घर जागेचे बक्षीस पत्र केल्याचे त्याला अलिकडेच कळाले आहे. त्यामुळे तिने त्याबाबतची दुरुस्ती मागितली आहे. परंतु प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे सदरच्या दुरुस्तीकरीता १६ वर्षांचा उशीर झाला आहे. निर्विवादपणे दाव्यास झालेला उशीर हा mixed question of law and fact असा आहे. त्यामुळे वादीने केलेली मागणी

मुदतीत नाही हे या क्षणी ठरविता येणार नाही.

४) निर्विवादपणे वादीने सदरचा दावा २८/१०/९३ रोजी दाखल केलेला आहे व तो सदरची दुरुस्ती १६ वर्षांनंतर मागत आहे. परंतु सदरच्या दुरुस्तीद्वारे दाव्याचे स्वरुप बदलत नाही. याउलट ती मान्य केल्यास दाव्याची पुनरावृती टाळण्यास मदत होईल. परंतु असे करीत असताना दाव्यास झालेल्या उशीराबाबत प्रतिवादीला योग्य ती भरपाई मिळणे आवश्यक आहे. म्हणुनच या सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

## आदेश

१) वादीचा अर्ज मान्य करण्यात येत आहे.

२) सदरची दुरुस्ती तिने पुढील तारखेपर्यंत करावी.

३) अर्जाच्या खर्चादाखल वादीने रु.१००/— प्रतिवादीला द्यावेत.

कोरेगांव<br>
दिनांक : १४/०१/२००९

(यो.शं.दहिकर)<br>
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,<br>
कोरेगांव